# अमरावती महानगरपालिका, अमरावती
## दिनांक २९.०७.२०२२ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक २३ :-** अमरावती शहराचा सन २०२१-२०२२ चा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल मा. प्रशासक सर्वसाधारण सभेचे अवलोकनार्थ.

**ठराव क्रमांक २३ :-** अमरावती शहराचे एकुण क्षेत्रफळ १२१.६५ चौ. कि.मी. असुन शहराची लोकसंख्या सुमारे ८ लक्ष आहे. शहराची विकासाकडे वाटचाल होत असतांना विविध स्वरुपाची विकासात्मक कामे अविरतपणे शहराच्या विविध भागात सुरु असतात, विविध विकास कामापासुन निर्माण होणारी धूळ, कचरा जाळणे, वाहनांमधून निघणाऱ्या धूर इत्यादी मुळे हवाप्रदुषण होते. त्याअनुषंगाने दैनंदिन जीवनमानातील काही सवयी बदलून तसेच आपले व्यस्त दिनचर्येतुन थोडासा वेळ काढून प्रत्येक नागरीक पर्यावरण संवर्धन करण्यास व प्रदुषणावर नियंत्रण राखण्याकरीता सहकार्य करु शकतो. पर्यावरण समस्याचे सुव्यवस्थितपणे नियोजन करुन मार्गक्रमण व कार्यवाही करण्याकरीता प्रशासनास व सामान्य नागरिकांना मार्गदर्शक म्हणून उपलब्ध असलेले दस्तावेज म्हणजे पर्यावरण सद्यस्थिती अहवाल होय. हा अहवाल तयार करत असतांना पर्यावरणाचे विविध घटकांची सद्यस्थिती, त्या अनुषंगाने विविध विभागांमार्फत करावयाच्या उपाययोजना, शास्वत पध्दतीने पायाभुत सुविधा विकसीत करणे, पर्यावरण संरक्षणासाठी अस्तित्त्वात असलेल्या विविध कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी व पुर्ततेहेतू पालन करावयाचा अनुक्रमे इत्यादी बाबींचा विचार करण्यात आला आहे.

प्रस्तुत अहवाल तयार करत असतांना सन २०२०-२०२१ चा अहवाल आधारभुत गृहीत धरुन माहितीचे अद्यावतीकरण करण्यात आले आहे. श्री शिवाजी सायन्स कॉलेज, अमरावती यांचे सोबत सामंजस्य करार करण्यात आला असून त्या अनुषंगाने श्री शिवाजी सायन्स कॉलेज, व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचेकडुन प्रदुषणा संबंधीची आकडेवारी प्राप्त करुन घेण्यात आली आहे. प्रदुषण तपासणी संर्दभातील उपलब्ध आकडेवारीचे अनुषंगाने सन २०२१-२०२२ चा अहवाल तयार करुन घेण्यात आला आहे. विस्तृत अहवालातील सारांश खालील प्रमाणे असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(अ) नुसार अहवाल मा.प्रशासक सर्वसाधारण सभेचे अवलोकनार्थ.

**वार्षीक वायु प्रदुषण स्थिती अहवाल (म.प्र.नि.मं. कडून प्राप्त माहिती ):**

अमरावती शहरातील हवेच्या गुणवत्तेबाबत Ambient Air Quality Monitoring (AAQM) अंतर्गत प्राप्त आकडेवारीनुसार

- रहिवाशी क्षेत्रात $NO_x$ व $SO_2$ चे प्रमाण अनुक्रमे सरासरी

१२.८३$\mu g/m^3$ व सरासरी ११.५९ $\mu g/m^3$ एवढे आढळले. हे प्रमाण प्रदुषण पातळी (८० $\mu g/m^3$) पेक्षा कमी आहे. RSPM चे प्रमाण सरासरी ५५.०० $\mu g/m^3$ म्हणजेच अनुज्ञेय पातळी (१०० $\mu g/m^3$) पेक्षा कमी आढळले. मागील वर्षीच्या तुलनेत म्हणजेच सन २०२०-२०२१ मध्ये RSPM चे प्रमाण ४८.६१ $\mu g/m^3$ आहे, त्यानुसार RSPM चे सरासरी प्रमाणात वाढ झाल्याचे आढळून आले आहे. तथापी सन २०१९-२०२० मध्ये RSPM चे सरासरी प्रमाण ६९.६४ $\mu g/m^3$ आढळुन आले होते त्यापेक्षा सन २०२१-२०२२ मध्ये हे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते.

औद्योगीक क्षेत्रात उन्हाळ्यामध्ये $NO_x$व $SO_2$ चे प्रमाण अनुक्रमे सरासरी १४.६२ $\mu g/m^3$ व १२.४७ $\mu g/m^3$ एवढे आढळले असुन हे प्रमाण प्रदुषण पातळी पेक्षा कमी आहे. RSPM चे प्रमाण सरासरी ६१.३१ $\mu g/m^3$ म्हणजेच अनुज्ञेय पातळीपेक्षा कमी आढळले. मागील वर्षीच्या तुलनेत म्हणजेच सन २०२०-२०२१ मध्ये RSPM चे प्रमाण ५३.३९ $\mu g/m^3$ आहे, त्यानुसार RSPM चे सरासरी प्रमाणात वाढ झाल्याचे आढळून आले आहे. तथापी सन २०१९-२०२० मध्ये RSPM चे सरासरी प्रमाण ८५.८३ $\mu g/m^3$ आढळुन आले होते त्यापेक्षा सन २०२१-२०२२ मध्ये हे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते.

व्यापारी क्षेत्रात उन्हाळ्यामध्ये $NO_x$ व $SO_2$ चे प्रमाण अनुक्रमे सरासरी १६.३० $\mu g/m^3$ व १३.८२ $\mu g/m^3$ एवढे आढळले असुन हे प्रमाण प्रदुषण पातळी पेक्षा कमी आहे. RSPM चे सरासरी प्रमाण ७१.०० $\mu g/m^3$ म्हणजेच अनुज्ञेय पातळीपेक्षा कमी आढळले. मागील वर्षीच्या तुलनेत म्हणजेच सन २०२०-२०२१ मध्ये RSPM चे प्रमाण ५६.८१ $\mu g/m^3$ आहे, त्यानुसार RSPM चे सरासरी प्रमाणात वाढ झाल्याचे आढळून आले आहे. तथापी सन २०१९-२०२० मध्ये RSPM चे सरासरी प्रमाण ९३.३० $\mu g/m^3$ आढळुन आले होते त्यापेक्षा सन २०२१-२०२२ मध्ये हे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते.

सन २०१९-२० शी तुलना करता वाणिज्य क्षेत्रात RSPM चे पातळीत सुधारणा झाली असल्याचे दिसून येते. हि समाधानाची बाब असली तरीही याकरीता अधिक प्रयत्नांची गरज आहे. सद्यास्थितीत शहरात मोठया प्रमाणात पायाभुत सुविधा (जसे, रस्ते, नाल्या, उड्डाणपुल) उभारण्याचे कार्य सुरु असून त्यामूळे RSPM चे काही प्रमाणात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. भविष्यात हि कामे पुर्ण झाल्यानंतर RSPM चे प्रमाणात घट होणे अपेक्षित आहे.

**वार्षीक वायु प्रदुषण स्थिती अहवाल (सामंजस्य करारानुसार प्राप्त माहिती)**

रहिवाशी क्षेत्रात RSPM चे प्रमाण सरासरी ५४.६० $\mu g/m^3$ म्हणजेच अनुज्ञेय पातळी (१०० $\mu g/m^3$) पेक्षा कमी आढळून आले. $NO_x$ आणि $SO_२$ चे प्रमाण सरासरी अनुक्रमे १२.८० व १२.०० $\mu g/m^3$ असुन हे प्रमाण प्रदुषण पातळी (८० $\mu g/m^3$ ) पेक्षा कमी आहे.

औद्योगीक क्षेत्रात RSPM चे प्रमाण सरासरी ६१.१० $\mu g/m^3$ म्हणजेच अनुज्ञेय पातळी (१०० $\mu g/m^3$) पेक्षा कमी आढळून आले. $NO_x$ आणि $SO_२$ चे प्रमाण सरासरी अनुक्रमे १५.२० व १८.३० $\mu g/m^3$ असुन हे प्रमाण प्रदुषण पातळी (८० $\mu g/m^3$ ) पेक्षा कमी आहे.

व्यापारी क्षेत्रात RSPM चे प्रमाण सरासरी ७० $\mu g/m^3$ म्हणजेच अनुज्ञेय पातळी (१०० $\mu g/m^3$) पेक्षा कमी आढळून आले. $NO_x$ आणि $SO_२$ चे प्रमाण सरासरी अनुक्रमे १६.१० व १४.०० $\mu g/m^3$ असुन हे प्रमाण प्रदुषण पातळी (८० $\mu g/m^3$ ) पेक्षा कमी आहे.

शहरातील पर्यावरण स्थितीचे अवलोकन केल्यास सन २०१६-२०१७ व २०१७-२०१८ मध्ये व्यापारी क्षेत्रामधील हवेतील RSPM चे प्रमाण हे अनुज्ञेय पातळीपेक्षा जास्त आहे, परंतु सन २०१९-२०२० ते सन २०२१-२०२२ या आर्थीक वर्षात यामध्ये घट झाली असल्याचे दिसून येते. राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रम अंर्तगत महानगरपालिके तर्फे विविध प्रकारे करण्यात आलेले प्रयत्न व उपाययोजना यामूळे हवेच्या गुणवत्ते मध्ये सुधारणा दिसून येते. हि समाधानाची बाब असली तरीही याकरीता अधिक प्रयत्नांची गरज आहे.

सन २०२०-२०२१ चे तुलनेत $\mathbf{NO_x}$, $\mathbf{SO_२}$ व **RSPM** चे सरासरी प्रमाणात सन २०२१-२०२२ मध्ये रहिवासी, औद्योगिक क्षेत्रामधील सरासरी प्रमाणामध्ये वाढ झाली असल्याचे दिसून येते. सन २०२०-२०२१ मध्ये कोव्हीड -१९ महामारीमूळे शहरातील उद्योग, व्यवसाय बंद होते तसेच जनमाणसांची वाहतूक देखील मंदावली होती. परंतु सन २०२१-२०२२ मध्ये जनजीवन सुरळीत झाले होते. त्याअनुषंगाने सन २०२०-२०२१ व २०२१-२०२२ ची तुलना करता, सन २०२१-२०२२ मध्ये शहरातील हवेच्या प्रदुषण पातळी काही प्रमाणामध्ये वाढ झाली असल्याचे दिसुन येते. तथापि Air Quality classificataion नुसार हवा प्रदुषणाचे सरासरी प्रमाण ५०$\mu g/m^3$ पर्यंत असल्यास Good या वर्गवारीमध्ये शहराचा समावेश होतो. तसेच प्रदुषणाचे सरासरी प्रमाण १०० $\mu g/m^3$ पर्यंत असल्यास Satisfactory या वर्गवारीमध्ये शहराचा समावेश होतो. यापुढे AQI च्या १०१ $\mu g/m^3$ ते २०० $\mu g/m^3$, २०१ $\mu g/m^3$ ते ३०० $\mu g/m^3$, ३०१ $\mu g/m^3$ ते ४०० $\mu g/m^3$, व ४०० $\mu g/m^3$

पेक्षा अधिक म्हणजेच अनुक्रमे Moderate, Poor, Very Poor, Severe अश्या चार वर्गवारी अस्तित्वात आहे. सद्यस्थितीत अंमरावती शहराचा समावेश Satisfactory या वर्गवारीमध्ये आहे. मागील सहा वर्षाच्या आकडेवारीचा तुलनात्मक अभ्यास केल्यास असे दिसून येते की, अमरावती शहरातील हवेच्या गुवणवत्तेचा विचार करता $NO_x$ , व $SO_2$ चे प्रमाण हे अनुज्ञेय पातळीपेक्षा खुप कमी असल्यामूळे हि प्रदुषके चिंतेचा विषय नाहीत. तसेच रहिवासी व औद्योगिक क्षेत्रातील चे RSPM प्रमाण देखील उपरोक्त कालावधीत अनुज्ञेय पातळीमध्ये आढळून आले आहे. व्यापारी क्षेत्रातील RSPM चे प्रमाण अनुज्ञेय पातळीपेक्षा अधिक असणे हा सर्वाधिक चिंतेचा विषय होता परंतु मागील सहा वर्षाचे कालावधीत यामध्ये सातत्याने घट झाली असून हि समाधानाची बाब आहे. सन २०१६-२०१७ पासुन व्यापारी क्षेत्रातील RSPM चे तुलनात्मक प्रमाण दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | सन | RSPM **(व्यापारी क्षेत्र) (अनुज्ञेय पातळी १००** $\mu g/m^{3})$ |
|---|---|---|
| १. | २०१६-२०१७ | १४१ $\mu g/m^3$ |
| २. | २०१७-२०१८ | १२१.२८ $\mu g/m^3$ |
| ३. | २०१८-२०१९ | ११८.७६ $\mu g/m^3$ |
| ४. | २०१९-२०२० | ९३.३० $\mu g/m^3$ |
| ५. | २०२०-२०२१ | ५६.८१ $\mu g/m^3$ |
| ६. | २०२१-२०२२ | ७१.०० $\mu g/m^3$ |

<u>**ध्वनी प्रदुषण :**</u>

दिवसेंदिवस वाढणारे नागरीकरण, वाहनांची संख्या, डी जे संस्कृतीचे वाढते प्रमाण, यामूळे शहरामध्ये ध्वनीचे प्रदुषण पातळीमध्ये वाढ होतांना दिसून येते. ध्वनी प्रदुषणामूळे मानवी आरोग्यावर शारीरीक व मानसीक दृष्परीणाम होतात हि बाब निष्पन्न झाली आहे. नागरी क्षेत्रामध्ये निर्माण होणारे ध्वनी प्रदुषणावर नियंत्रण राखण्याकरीता स्थानिक स्वराज्य क्षेत्राअंतर्गत शैक्षणिक संस्था, दवाखाने, न्यायालय या सभोवती १०० मीटर चा परिसर शांतता क्षेत्र घोषित आवश्यक आहे त्याअनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकुण ५८१ शांतता क्षेत्र घोषीत करण्यात आले आहेत.

**ध्वनीच्या तीव्रतेची मानके खालील प्रमाणे आहे.**

| अ. क्र | क्षेत्रांची वर्गवारी | ध्वनीच्या तीव्रतेची मर्यादा dB (A) Leq | |
|---|---|---|---|
| | | दिवसा | रात्री |
| (१) | औद्योगिक क्षेत्र | ७५ | ७० |
| (२) | वाणिज्य क्षेत्र | ६५ | ५५ |
| (३) | रहिवासी क्षेत्र | ५५ | ४५ |
| (४) | शांतता क्षेत्र | ५० | ४० |

शहरातील निर्माण होणारे ध्वनी प्रदुषणासंदर्भात तक्रार प्राप्त झाल्यास त्याविषयी उचित कार्यवाही करणेबाबत पोलीस विभागास अधिकार प्राप्त असून ध्वनी मर्यादा पार झाल्याबाबत नागरीकांकडून तक्रार दाखल झाल्यास पोलीस विभागाकडून कारवाई करण्यात येते. त्याअनुषंगाने नागरीकांनी ध्वनी प्रदुषण होवू नये याकरीता दक्षता घेणे आवश्यक आहे. घोषीत करण्यात आलेल्या शांतता क्षेत्राचे ठिकाणी शांतता क्षेत्र दर्शक फलकांची उभारणी करण्यात आली आहे. अमरावती शहरामध्ये ध्वनी प्रदुषणा संदर्भात क्षेत्रनिहाय खालीलप्रमाणे नोंद आढळून आली आहे.

| अ. क्र | क्षेत्रांची वर्गवारी | ध्वनीची सरासरी तीव्रता dB (A) Leq | |
|---|---|---|---|
| | | दिवसा | रात्री |
| (१) | औद्योगिक क्षेत्र | ७२ | ५७ |
| (२) | वाणिज्य क्षेत्र | ७४ | ५४ |
| (३) | रहिवासी क्षेत्र | ५८ | ४४ |
| (४) | शांतता क्षेत्र | ५७ | ४१ |

**पाणी गुणवत्ता :**

- Station I - Tranport Nagar (Bore Well)
- Station II - Rajapeth (Public well)
- Station III - MIDC Area Bypass (Bore Well)
- Station IV -Masanganj (Tap Water)
- Station V - Chattri Lake (Surface water)
- Station VI - Wadali Lake (Surface Water)

## Physico-chemical Characteristics of Amravati

| Parameters | Station I | Station II | Station III | Station IV | Station V | Station VI |
|---|---|---|---|---|---|---|
| W.T स्C | २६ | २४.७ | २५ | २७ | २५ | २२ |
| pH | ७.२ | ७.७ | ७.१ | ७.७ | ७.८ | ७.४ |
| Conductivity uc/cm | ८९२ | ७५९ | ७०९ | ३७४ | ७६१ | ६१८ |
| Turbidity | ९.३३ | ९.८ | १०.२१ | ५.६७ | ३६ | ३८ |
| D.O | ५.८ | ५.७ | ५.६ | ६.९ | ७.१ | ७ |
| T.D.S. | ५८९ | ५८८ | ५११ | २६७ | ५२७ | ४०६ |
| T.H. | ३८८ | ३४२ | २४२ | २९६ | ३६८ | ३६९ |
| P.A. | १८४ | १०२ | ९४ | ६५ | १६७ | १८१ |
| T.A | १७१ | १४९ | ११८ | ८४ | २१७ | २३५ |
| $CaCO_3$ | २५४ | २१५ | १५३ | १३४ | ११६ | १८५ |
| Ca | ७८ | ६७ | ७७ | ५४ | ६६.३ | ६६ |

| Parameters | Station I | Station II | Station III | Station IV | Station V | Station VI |
|---|---|---|---|---|---|---|
| Mg | ३८ | ४३ | ३३ | ३६ | ४१ | ४५ |
| COD | -- | -- | -- | -- | ८९ | ७८ |
| BOD | -- | -- | -- | -- | १९ | १७ |

* All the readings are in mg/lit except Temperature, pH, Conductivity and Turbidity

**सांडपाणी व्यवस्थापन :**

सन २०१५-२०१६ या आर्थीक वर्षापासुन शिर्ष क्र. २६५ "पर्यावरण पुरक प्रकल्प निधी" ृनुसार सदर तरतूद अंदाजपत्रकात समाविष्ठ करण्यात आली. नियमानुसार सदर निधीचा वापर शहरातील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारणी व सांडपाणी प्रकल्प व्यवस्थापन या दोन कामाकरीता करण्याची तरतूद आहे. तथापी घनकचरा व्यवरथापन व सांडपाणी व्यवस्थापन याकरीता महानगरपालिकेस शासनाकडून भांडवली उत्पन्न प्राप्त होत असल्या कारणाने यासंदर्भातील सर्व लेखाशिर्ष पर्यावरण पुरक प्रकल्प निधी अंतर्गत वापरण्यात येतात.

केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून शहरातील राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रम अंतर्गत शहरामध्ये पर्यावरण पुरक कार्य करण्याचे अनुषंगाने सन २०२१-२०२२ पासुन २०२५ पर्यंत पाच वर्षाकरीता रु. २५ कोटी याप्रमाणे वार्षीक तरतुद करण्यासंदर्भात निर्देश प्राप्त होते. त्याअनुषंगाने महानगरपालिकेच्या वार्षीक अंदाजपत्रकामध्ये NCAP शी संबंधीत लेखाशिर्ष, ज्याअंतर्गत हवेची गुणवत्ता सुधारण्याकरीता कार्यवाही करता येवू शकते, जसे- रस्ते निर्मीती, रस्ते दुरुस्ती, रस्ते डांबरीकरण/ क्राँक्रीटीकरण , वृक्ष लागवड करणे, हरीत पट्टा विकासीत करणे इत्यादी प्रकारची कामे करण्यात येतात असे लेखाशिर्ष राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रम (NCAP) अंतर्गत समाविष्ठ करण्यात येवून आर्थिक वर्ष सन २०२१-२०२२ पासुन रु. २५ कोटी वार्षीक अंदाजपत्रकीय तरतुद करण्यात आली आहे.

सांडपाणी व्यवस्थापनाअंतर्गत भुयारी गटार योजना व लालखडी येथील सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारणी व कार्यान्वयन संदर्भातील कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधीकरण मार्फत करण्यात येत असून ७४.५० द.ल.लि. क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया केंद्र कार्यान्वित करण्यात आला आहे. उपरोक्त प्रकल्पाच्या कार्यान्वयनाकरीता महानगरपालिकेकडून निधी महाराष्ट्र जीवन प्राधीकरणास हस्तांतरीत करण्यात आला आहे. शहरात विविध ठिकाणी भुयारी गटार योजनेचे कामे सुरु असून याकामांकरीता करण्यात आलेल्या खोदकामांमुळे रस्त्यावर येणारी मृदा, रेती व अवशेष यांचे वाहनांसमवेत वहन होवून परीसरातील हवेमध्ये चे प्रमाणात वाढ होवून हवेच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम झाल्याचे दिसून येते. त्याअनुषंगाने खोदकाम करीत असतांना बॅरीकेटींग करणे तसेच पाईपलाईन टाकण्याचे काम पुर्ण झाल्यानंतर रस्ते पुर्ववत करणे यासंदर्भातील खबरदारी म.जी.प्रा. ने घेणे आवश्यक आहे.

अमरावती शहरामध्ये दररोज सुमारे ९२ M.L.D. एवढे सांडपाणी निर्माण होते. शहरामधील सांडपाणी पेढी नदीच्या माध्यमातुन पुढे पूर्णा नदीस मिळत असल्याकारणाने अकोला शहर व दरम्यानच्या गावांना प्रदुषीत पाणीपुरवठा होत असल्याबाबतचा विषय शासन पातळीवरील बैठकांमध्ये वारंवार चर्चेकरीता येतो. Water (Prevention and control of Pollution) Act, १९७४ नुसार

कोणत्याही प्रकारचे दुषीत पाणी/सांडपाणी जलस्त्रोतांमध्ये प्रक्रीया न करता सोडण्यास मनाई आहे. सांडपाणी प्रक्रीया केंद्र कार्यान्वयन व घनकचरा व्यवस्थापन याकरीता महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये भांडवली खर्चाच्या २५% रक्कम राखीव करुन त्याचा विनीयोग करणे कायद्याने बंधनकारक आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्र जीवन प्राधीकरणाचे माध्यमातून लालखडी येथे अमरावती शहराकरीताचा ३०.५० M.L.D क्षमतेचा सांडपाणी प्रकल्प सुरु करण्यात आला आहे, तसेच ४४ M.L.D प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. STP चे कार्यान्वयनाकरीता आवश्यक असणारा निधी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण मंडळाचे कार्यालयास वर नमुद २५% निधीमधून अदा करण्यात येतो. उपरोक्त ७४.५० M.L.D प्रकल्प पुर्ण क्षमतेने कार्यान्वित होण्याकरीता भुयारी गटार योजने अंतर्गत प्रॉपर्टी कनेक्शन पुर्ण होणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने अमृत योजनेअंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधीकरण तर्फे कार्यवाही सुरु असून हि कार्यवाही जलदगतीने होणे आवश्यक आहे.

**घनकचरा व्यवस्थापन :**

नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी ) नियम २००० व घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये नागरी घनकचरा व्यवस्थापनचा सविस्तर प्रकल्प अहवाल अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान यांचे पत्र क्र राअस/घनकचरा ७०८/२०१७-१८ दि. ७/६/१७ अन्वये शासन नियुक्त कंपनी मार्स प्लॅनिंग ॲन्ड इंजिनियरींग सर्व्हिसेस प्रा. लि. अमहदाबाद यांचेकडून DPR तयार करण्यात आलेले असून सदर अहवालास मा. सर्वसाधारण सभा दि. १९/१२/२०१७ च्या सभेत ठराव क्र. ७१ नुसार मंजुरी प्राप्त झाली व अंतिम मान्यतेकरीता DPR शासनाकडे सादर करण्यात आला.

राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान यांचे मार्फत सदर DPR ला तांत्रीक मंजुरी करीता निरी नागपुर यांचे कडे पाठविला असता, निरी नागपुर या संस्थेतील Environment Impact and sustainability Division या विभागाने तसेच MJP अमरावती यांच्याकडून घनकचरा व्यवस्थापन सविस्तर अहवालच्या अनुषंगाने DPR ला तांत्रिक मंजुरी प्राप्त करून घेण्यात आली आहे. सदरहू सविस्तर प्रकल्प अहवालास शासनाकडून प्राप्त अंतीम मंजुरीच्या अनुषंगाने शहरामध्ये खालीलप्रमाणे तीन ठिकाणी विकेंद्रीत पध्दतीने प्रकल्पांची उभारणी करणे प्रस्तावीत होते.

१. सुकळी कंपोस्ट डेपो येथे ९.३५ हे. जागेवर २०० TPD
२. आकोली बायपास येथे २.८३ हे.जागेवर १०० TPD
३. बडनेरा कोंडेश्वर मध्यवर्ती नाका १.१५ हे. जागेवर ५० TPD

उपरोक्त प्रकल्पांकरीता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत होता.

| अ. क्र. | प्रकल्प कार्यान्वित करण्यात येणारी जागा | जागेचे वर्णन | प्रकल्प क्षमता | DPR Cost (in Core Rs.) |
|---|---|---|---|---|
| १ | सुकळी कंपोस्ट डेपो (सर्व्हे क्र. १५५ व १५६) | ९.३५ HR. | २०० MTP | Rs. १७.५८ Cr. |
| २ | आकोली बायपास (मौजा बडनेरा, सर्व्हे क्र. २९५ मधील) | २.८३ HR. | १०० MTP | Rs. ७.१३ Cr. |
| ३ | बडनेरा (कोंडेश्वर मार्ग अमरावती नाक्याजवळ) | १.१५ HR. | ५० MTP | Rs. ५.४१ Cr. |
| | | Total | | **Rs. ३०.१२ Cr.** |
| | | IFC/ जनजागृती करीता | | Rs. ०१.०० Cr. |
| | | मनपा सुकळी कंपोस्ट डेपो येथे जमा असलेल्या जुन्या कचऱ्यावर प्रक्रिया | | Rs. ६.९७ Cr. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करणे | |
| | | एकुण DPR ची cost | Rs. ३८.०९ Cr. |

| अ.क्र. | विवरण | Cost (in Core Rs.) |
|---|---|---|
| १ | एकुण DPR ची cost | Rs. ३८.०९ Cr. |
| २ | MoUD Share (३५% of the total DPR Cost) | Rs. १३.३३ Cr. |
| ३ | GoM share (४०% of the Match MoUD) | Rs. ०८.८८ Cr. |
| ४. | ULB Share (Finance Commission ) | Rs. १५.८७ Cr. |

शहरामध्ये दैनंदिन निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरीता आकोली येथे २.५० हेक्टर जागेवर दररोज १०० टन घनकचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करण्याकरीता प्रकल्प उभारणीची कार्यवाही करण्यात आली असून जुलै २०२१ पासुन हा प्रकल्प पुर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यात आला आहे.

शहरात दैनंदिन निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरीता सुकळी येथे ९.५० हेक्टर जागेवर दररोज २०० टन घनकचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करण्याकरीता प्रकल्प उभारणीची कार्यवाही करण्यात आली असून डिसेंबर २०२१ पासुन हा प्रकल्प पुर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यात आला आहे. दैनंदिन निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करण्याकरीता महानगरपालिकेतर्फे दोन प्रकल्प सुरु करण्यात आले आहेत.

सद्यस्थितीत अमरावती शहरात दैनंदिन सुमारे १९० ते २२० टन घनकचरा निर्माण होत असून निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरीता ३०० टन क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले असल्यामूळे आजमितीस निर्माण होणाऱ्या १०० % घनकचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करण्यास महानगरपालिकेस यश आले असून, निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यापेक्षा सुमारे ३३ टक्क्याने प्रकल्प क्षमता अधिक असल्याने येणाऱ्या काही वर्षांच्या कालावधीचे नियोजन करण्यास देखील महानगरपालिकेस यश आले आहे.

सुकळी कंपोस्ट डेपो येथे बायोमायनिंगचे कामाचा पहिला टप्पा पुर्ण झाला असून यामध्ये १.३१ लक्ष घनमी. लिगसी वेस्टची शास्त्रोक्त विल्हेवाट लावण्यात आली आहे. उर्वरीत जमीनीवरील ४.५१ लक्ष घनमी. लिगसी वेस्टवर बायोरिमेडीऐशन / बायोमायनिंग करण्याकरीता कामाकरीता निविदा प्रक्रियेअंती कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने उर्वरीत लिगसी वेस्टची शास्त्रोक्त विल्हेवाट लावण्याचे काम सुरु होवुन शहरातील संपुर्ण लिगसी वेस्टची समस्या संपुष्टात येणार आहे.

शहराचे पर्यावरण चांगले राखण्याच्या दृष्टीकोनातुन महानगरपालिकेतर्फे तसेच शासनातर्फे विविधअंगी उपाययोजना करण्यात येत आहेत, परंतु यासंदर्भात जास्तीत जास्त सकारात्मक प्रचिती येण्याकरीता लोकसहभाग आवश्यक आहे.

**<u>जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन -</u>**

अमरावती विभाग व महानगरपालिका क्षेत्रांअतर्गत निर्माण होणाऱ्या दैनंदिन जैववैद्यकीय कचऱ्याचे संकलन, वहन प्रक्रिया व शास्त्रोक्त विल्हेवाट लावण्याकरीता ग्लोबत ईकोसेव्ह सिस्टीम या कंपनीसोबत करारनामा करण्यात आला असून सदरहू कंपनी सन २००३ पासुन अविरतपणे सेवा देत आहे. सन २०२०-२०२१ या वर्षात

कोव्हीड -१९ जागतिक महामारीमुळे या यंत्रणेवरील ताण वाढला असला तरी शहरात निर्माण होणारा दैनंदिन जैववैद्यकीय कचरा तसेच कोव्हीड -१९ हॉस्पिटल्स, क्वारंटाईन सेंटर्स मधुन विलगीकरण करण्यात आलेला जैववैद्यकीय कचऱ्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावण्यात यश आले आहे. सदरहू प्रकल्पामध्ये सन २०२०-२०२१ या मध्ये एकूण २०२६६६.४५ कि.ग्रॅ. जैववैद्यकीय कचऱ्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावण्यात आली असुन त्यामध्ये ५०२६४.३७ कि.ग्रॅ. कोव्हीड वेस्टचा समावेश होता. सन २०२१-२०२२ मध्ये माहे एप्रिल २०२१ ते मार्च २०२२ या कालावधीत एकूणं १४३९७८.४९ कि.ग्रॅ. जैववैद्यकीय कचऱ्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावण्यात आली असुन त्यामध्ये ३३६८३.१० कि.ग्रॅ. कोव्हीड वेस्टचा समावेश आहे.

**वृक्ष लागवड -**

हवा प्रदुषणांवर नियंत्रण ठेवणेकरीता शहरामध्ये वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन आवश्यक आहे. त्याहेतुने वेळोवेळी महानगरपालिकेकडून दरवर्षी वृक्ष लागवड व संगोपन करण्यात येते. अमरावती महानगरपालिका क्षेत्रामध्ये रस्त्याच्या कडेला व खुल्या जागेमध्ये सन २०१९-२०२० मध्ये २२६९४ वृक्ष लागवड करण्यात आली त्यापैकी १८१५५ वृक्ष संवर्धन करण्यात यश प्राप्त झाले, करण्यास सन २०२०-२०२१ मध्ये ६५०० वृक्ष लागवड करण्यात आली त्यापैकी ५९५० वृक्ष संवर्धन करण्यास यश प्राप्त झाले. तसेच सन २०२१-२०२२ मध्ये ५७०० वृक्ष लागवड करण्यात आली त्यापैकी ५११३० वृक्ष संवर्धन करण्यात यश प्राप्त झाले.

अमरावती शहराकरीता शासनाकडून ग्रीन स्पेस डेव्हलपमेंट अंतर्गत तीन प्रकल्प मंजुर करण्यात आले होते. त्याअनुषंगाने शिवटेकडी, भिमटेकडी व आकोली याठिकाणी ग्रीन स्पेस विकासीत करण्यात आले असून शिवटेकडी येथे ६८०० वृक्षांची लागवड करण्यात येवून त्यापैकी एकुण ५९८४ वृक्ष संवर्धन करण्यात आले तसेच भिमटेकडी व आकोली येथे अनुक्रमे २६७५ व १३८० वृक्ष लागवड करण्यात आली असून त्यापैकी २४०७ व १२४३ वृक्ष संवर्धन करण्यात महानगरपालिकेस यश आले आहे.

**जल व्यवस्थापन -**

शहरातील बऱ्याच भागामध्ये जमीनीतील पाण्याची पातळी खुपच खाली जात असल्याचे निर्दशनास आले त्याअनुषंगाने उपाययोजना म्हणून शहरामध्ये एकेकाळी प्रमुख जलस्त्रोत असणारे छत्री तलाव, वडाळी तलाव व झीरी तलाव यामधील गाळ काढणे, सौंदर्यीकरण व सुशोभीकरण करण्यात आले.

शहरामधील वडाळी तलावमधील लोकसहभाग व श्रमदानातून तलावातील गाळ काढण्याचे व खोलीकरण करण्याचे काम करण्यात आले. तसेच झीरी तलावाचे महानगरपालिका स्वनिधी सौदंर्यीकरण करणे याअंतर्गत रु. २५.५० लक्ष निधी मंजुर होता. त्यापैकी विषयांकित कामी रु. २५.१० लक्ष निधीचा विनियोग करून तलावाचे सौदंर्यीकरणाचे काम करण्यात आले. शहरातील छत्री तलावाकरीता - सौदंर्यीकरण व सुशोभीकरण शिर्ष मुलभुत सोयी सुविधा अंतर्गत रू. १२.५० कोटी निधी मंजुर होता त्यापैकी विषयांकित कामी रु. ८.३४ कोटी निधीचा विनीयोग करण्यात येवून छत्री तलाव सौदंर्यीकरण व सुशोभीकरण करण्याचे काम करण्यात आले.

रेन वॉटर हार्वेस्टींग व शोष खड्डे निर्मिती करण्याकरीता नागरीकांना प्रोत्साहित करण्यास्तव महानगरपालिकेतर्फे विविध उपक्रम राबविण्यात आले, या

उपक्रमाकरीता विविध संघटना, अशासकीय संस्था, प्रसारमाध्यमांच्या संस्था व नागरीक यांनी मोठया प्रमाणात सहकार्य केले आहे.

नागरीकांनी आपले इमारतीमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग केले असल्यास मालमत्ता करातील सामान्य कराच्या ५% किंवा रु. २०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी सुट महानगरपालिकेतर्फे देण्यात येत आहे. त्याअनुषंगाने जास्तीत जास्त नागरींकांनी रेन वॉटर हार्वेस्टिंग करून या योजनेचा लाभ घेण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांचे पातळीवर पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारीत माझी वसुंधरा अभियान सन २०२०-२०२१ या आर्थीक वर्षापासुन राबविण्यात येत असून, सन २०२१-२०२२ करीता माझी वसुंधरा अभियान २.० मध्ये अमरावती महानगरपालिकेतर्फे सहभाग नोंदविण्यात आला. पर्यावरणाशी संबंधीत विविध कार्य जसे कि वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन, बगीच्यांची देखभाल दुरूस्ती, नविन बगीचे विकसीत करणे, दैनंदिन साफसफाई, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन, भुजल पुनर्भरण, एल.ई.डी सौर दिव्यांचा वापर, अपारंपारीक उर्जा स्त्रोत इत्यादी विविधअंगी कार्य उत्कृष्टरित्या महानगनरपालिकेतर्फे करण्यात येवून यासंदर्भात इतंभुत माहिती शासनाचे पोर्टलवर सादर करण्यात आली व त्याअनुषंगाने शासनाचे चमूकडून प्रत्यक्ष क्षेत्र-भेट देवून माहितीची पडताळणी करण्यात आली. सदरहू अभियानामध्ये अमरावती महानगरपालिकेला अमृत गटामध्ये विभाग स्तरावर प्रथम पारितोषीक घोषीत करून शासनातर्फे गौरव करण्यात आला.

शहराचे पर्यावरण चांगले राखण्याच्या दृष्टीकोनातुन महानगरपालिकेतर्फे तसेच शासनातर्फे विविधअंगी उपाययोजना करण्यात येत आहेत परंतु यासंदर्भात जास्तीत जास्त सकारात्मक प्रचिती येण्याकरीता लोकसहभाग आवश्यक आहे.

पर्यावरणाशी संबंधीत वर नमुद व इतर घटक यांची विस्तृत माहिती अहवालामध्ये नमूद असून सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाचा पर्यावरण सद्यास्थिती अहवालास मा. आयुक्त यांनी मान्यता प्रदान केली असुन प्रस्तुत अहवाल मा. प्रशासक सर्वसाधारण सभेचे अवलोकनार्थ सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रस्तृत अहवालाचे अवलोकन करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा/-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा/-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.